# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ८०/२०१४-१५/२९३ दिनांक : ३०/३/२०१५

**<u>आदेश केस क्र. ८०/१४-१५</u>**

| | |
|---|---|
| श्री. रतिकांत पंडितराव कुलकर्णी<br>मु. पो. शिये, ता. करवीर,<br>जि. कोल्हापूर. | अर्जदार |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर. | |
| २) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण विभाग-१, कोल्हापूर. | विरुध्द पक्षकार |
| ३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभागीय कार्यालय, कदमवाडी, कोल्हापूर | |

**कोरमः-** १. श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव
२. श्री. पी. एस. बुरांडे, सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.जी.बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रतिकांत पंडितराव कुलकर्णी, मु. पो. शिये, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांनी वितरण कंपनी, ग्रामीण विभाग-१ कोल्हापूर यांचेविरुध्द मंचाकडे दि. ०५.१२.२०१४ रोजी तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**<u>तक्रारीचे स्वरुप</u>**

श्री. रतिकांत पंडितराव कुलकर्णी, या नांवे गट क्र. १५१/४ मु. पो. शिये, १२.५ एच.पी. चे दिनांक ०१.०१.१९९९ पासून कनेक्शन चालू आहे. सदर जोडणीवर जून २०११ मध्ये मीटर क्रमांक ६१००२२०२४१ या क्रमांकाचे मीटर चालू आहे. आपणांकडून सप्टेंबर २०१२ पर्यंत जमा करणेची बीले दिली गेलेली आहेत. जुन २०११ मध्ये मीटर बसवल्यापासून सप्टेंबर २०१३ पर्यंत प्रत्यक्षात वापराची बीलजे न येता, अंदाजे युनिट वापराची बीले दिली गेलेली आहेत.

मी प्रत्येक वेळी भेटून सदर बीलाबद्दल तक्रार दाखल केली आहे. जून २०११ पासून चालू असलेला मीटर दिनांक १५-०७-२०१३ रोजी तपासणीसाठी काढले त्यादिवशी कनिष्ठ अभियंता शिये यांनी दोन वेगवेगळी मीटर वरील रिडींग नोंदवली आहेत. ती अनुक्रमे पुढीलप्रमाणे - १) ७३९४९ २) ७७५९९ अशा प्रकारची रिडींग नोंदवली गेल्याचे दिसून येते. त्यानंतर डिसेंबर २०१३ मध्ये मिटर बदलून दिल्यावर एकदम ४७१८१ इतक्या रिडींगचे बील दिले.

हा सर्व हिशेब पाहता वेळच्यावेळी व योग्यप्रकारे नोंद न घेतल्यामुळे मजला फटका बसला आहे. डिसेंबर २०१३ मध्ये मिटर बदलल्यावर प्रत्यक्ष वापरातील आलेले रिडींग योग्य व बरोबर असल्याने ती बीले भरण्यास मी तयार आहे, मात्र जून २०११ पासून डिसेंबर २०१३ पर्यंत दिलेली बीले प्रत्यक्षात नव्याने बीले तयार करुन देण्यात यावीत. तसेच सदरील काळातील जमा रक्कमेचा हिशोब गृहीत धरुन नव्याने हिशोबाची मांडणी करावी.

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिनांक २२.०८.२०१४ रोजी आदेश देवूनही त्याबाबत कोणतीही कारवाई झालेली नाही. तसेच तो आदेश मला मान्य नसून माझ्या अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार होवून योग्य न्याय मिळावा. मी आपल्या कृषी संजीवनी योजने अंतर्गत सर्व थकीत बीले भरली आहेत. तरी मला न्याय मिळून माझी जादा रक्कम मला परत मिळावी. तसेच चुकीचे व अंदाजे बीले देऊन मजला झालेल्या नाहक त्रासाबद्दल संबंधितास विनियमातील तरतुदीप्रमाणे दंडात्मक कार्यवाही व्हावी.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दिनांक २७.०२.२०१५ रोजी घेण्यात आली. तक्रारदार प्रतिनिधी श्री. रतिकांत पंडितराव कुलकर्णी, हे हजर होते. वितरण कंपनीतर्फे श्री. एस. बी. कांबळे, निम्नस्तर लिपीक (लेखा) व श्री. बी. ए. भोळे, उपकार्यकारी अभियंता, उपविभाग कदमवाडी हे उपस्थित होते.

श्री. रतिकांत पंडितराव कुलकर्णी, यांनी त्यांच्या तक्रारीचे स्वरुप वर नमुद केल्या प्रमाणे मंचासमोर मांडले. श्री. भोळे, उपकार्यकारी अभियंता यांनी तक्रारदाराच्या तक्रारीची दखल घेवून व तसेच अंतर्गत कक्ष, कोल्हापूर यांनी दिलेल्या २२.०८.२०१४ च्या आदेशाचे पालन केल्याचे सांगीतले. कक्षाने डिसेंबर २०१३ मध्ये आकारण्यात आलेल्या जुन्या मिटरची युनिट्स पैकी ७.१ टक्के जास्तीच्या युनिट्सची वजावट करुन उर्वरीत युनिट्स जुन २०११ पर्यंत समान विभागून त्या त्या वेळेच्या दराप्रमाणे आकारणी करुन वीज देयक दुरुस्त करावे असा आदेश दिला होता. ग्राहकाच्या मागणीप्रमाणे कृषी संजीवनीचा लाभ सात दिवसात देवू असे मंचापुढे सांगीतले.

सुनावणीनंतर ग्राहकास त्यांच्या बीलाबद्दल असणाऱ्या सर्व शंकांचे निरसन करण्यासाठी उपविभागीय कार्यालयात बोलावून घेवून करण्याबाबत वितरण कंपनीला निर्देश देण्यात आले. त्याप्रमाणे कृषी संजीवनीचा लाभ देवून तसेच योग्य ती बीलाची दुरुस्ती करुन ग्राहकाचे समाधान झाल्याचे कळविले आहे.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाच्या तक्रारीचे निरसन झाल्यामुळे तक्रार निकाली काढणे योग्य होईल काय?

उत्तर : होय.

**कारणमिमांसा**

सुनावणी दरम्यान वि.प.ने केलेल्या अभिकथनानुसार तक्रारदाराच्या तक्रारीची दखल घेवून योग्य ती बीले देण्यात आल्याचे निदर्शनास येते. तसेच ग्राहकास कृषी संजीवनी योजनेचा लाभ बीलामध्ये दिल्याचे दिसुन येते. ग्राहकाच्या तक्रारीचे निरसन झाल्यामुळे सदर तक्रार निकाली काढणे योग्य होईल असे मंचाचे मत झाले आहे.

खालील प्रमाणे आदेश -

**आदेश**

१. तक्रारदाराची तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा.विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

(जी. बी. पानकर)
सदस्य सचिव

अध्यक्ष, पद दिनांक १६-१२-२०१४ पासुन रिक्त.

पी. एस. बुरांडे : सदस्य

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.